रविवार, दि. ८ फेब्रुवारी २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक १६० वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

जगिवनहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# अर्थसंकल्पातून सर्वसामान्यांच्या विकासाला नवी दिशा मिळेल

## भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे





**जालना । प्रतिनिधी -** केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी १ फेब्रुवारी २०२६ रोजी केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ संसदेत सादर केला, या संदर्भात केंद्र सरकारच्या धोरणांची, विकासात्मक दृष्टीकोनाची व सर्वसामान्य जनतेसाठी असलेल्या तरतुदींची माहिती देण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या वतीने आयोजित करण्यात आलेला प्रचार-प्रसार व जनजागृती कार्यक्रम आज (ता.०७) रोजी वाघ्रूळ ता.जालना येथे यशस्वीरीत्या संपन्न झाला. यावेळी भाजपा जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती.

या कार्यक्रमाला जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांचे प्रमुख मार्गदर्शन लाभले. मार्गदर्शन भाषणात ते म्हणाले की, ‘‘केंद्रीय अर्थसंकल्प २०२६ हा देशाच्या उज्ज्वल भविष्यासाठीचा विकासाचा स्पष्ट आराखडा आहे. शेतकरी, कष्टकरी, मध्यमवर्ग, महिला आणि युवक यांना केंद्रस्थानी ठेवून हा अर्थसंकल्प सादर करण्यात आला आहे. ‘‘शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, कृषी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, थेट लाभ हस्तांतरण यामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. पायाभूत सुविधा, रस्ते, रेल्वे, आरोग्य व शिक्षण क्षेत्रात केलेल्या तरतुदी देशाच्या सर्वांगीण विकासाला गती देतील. देशाला आर्थिक, सामाजिक आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम बनवणे हेच सरकारचे ध्येय आहे असेही त्यांनी सांगितले व कार्यक्रमाचे आयोजन यशस्वीरीत्या पार पडल्याबद्दल किसान मोर्चा जिल्हाध्यक्ष सतीश केळकर सह सहकाऱ्यांचे अभिनंदन केले.

यावेळी भाजपा नेते माजी केंद्रीय मंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेऊन व भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांच्या प्रमुख उपस्थितीत इंदलकरवाडी ता. जालना येथील युवकांनी भाजपामध्ये जाहीर प्रवेश केला.

यामध्ये डीगांबर शेळके, सीताराम आसाराम इंदलकर, संपत गणपत इंदलकर, उद्धव विठोबा शिंदे, विजय राधाकिसन शेळके, सिताराम नारायण शिंदे, विष्णू भगवान घोलप, रामेश्वर ज्ञानोबा मोरे, सीताराम शामराव इंदलकर, शिवाजी गणपत इंदलकर, सोनाजी विठ्ठल इंदलकर, काशिनाथ शिंदे, नारायण घोलप, शंकर रामभाऊ इंदलकर, शिवाजी गायकवाड, बळीराम इंदलकर, विठ्ठल नारायण इंदलकर आदींनी प्रवेश केला.

या कार्यक्रमास जिल्हा सरचिटणीस वसंतराव शिंदे, तालुकाध्यक्ष संजय डोंगरे, प.स. सदस्य गजानन खरात, सरपंच सुधाकर खरात, सरपंच विलास खरात, उपसरपंच गोविंद खरात, विष्णू डोंगरे, विठ्ठल इंदलकर, करण निकाळजे, नागेश अंभोरे, सतीश जारे, शाम खरात, शिवा पाटील खरात, विलासराव खरात, शेवाळे सर, रामजी खरात, शरद खरात, कैलास खरात, राधेश्याम खरात, गणेश शेवाळे, तुळशीदास शेवाळे, शिवाजी गायकवाड, अविनाश मोहिते, गणेश तिडके, संजय वैद्य, अमोल खांडेभराड, जगदीश खरात, विठ्ठल इंदलकर, दत्ता तिडके, संजय खरात, लक्ष्मण खरात, जगन खरात, सुशील बोर्डे, प्रदीप खांडेभराड, करण निकाळजे आदींसह शेतकरी, युवक, महिला व सर्वसामान्य नागरिक मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

युवा आदर्श

### मत दान ...

सोसती सहज जरी
संकटे अनेक वावरी
मत देतात शेतकरी
अवघ्या देशा सावरी
मतदान रांगेत दिसे
कामगार न् कष्टकरी
बुडू द्या हो रोजंदारी
आनंदे मतदान करी
कामवाली सदाव्यग्र
कार्य व्यस्त घरोघरी
बोटास लागली शाई
मत दिले राम प्रहरी
होटिंग ड्युटी करता
शिक्षक त्रस्तावे जरी
भले पोस्टल पध्दती
मतदान नक्की तरी
दिव्यांग गर्दी फुलारी
जणू बनले वारकरी
सिनियरसिटीझन ते
कर्तव्यपूर्ती झडकरी
आम्ही मात्र मदमस्त
सुट्टी ही एन्जॉय करी
एकामताने न बिघडे
निर्लज्जता ठसे उरी
घसरले मताचे टक्के
बोंबा मारी कितीतरी
बोटाला ना लगे शाई
रूखरूख नसे अंतरी

**हेमंत मुसरीफ पुणे**
9730306996.

# व्यंकटेश नगर येथे संरक्षण भिंत बांधकामाचे उद्घाटन

**जालना । प्रतिनिधी -** व्यंकटेश नगर परिसरातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या विकासकामांचा शुभारंभ आज मोठ्या उत्साहात पार पडला. व्यंकटेश नगर येथील खुल्या जागेला संरक्षण भिंत बांधकामाच्या उद्घाटनाचा सोहळा शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनरावजी खोतकर यांच्या शुभहस्ते पार पडला.

या संरक्षण भिंत बांधकामामुळे परिसरातील नागरिकांना पावसाळ्यात होणाऱ्या अडचणींवर कायमस्वरूपी तोडगा मिळणार असून, नागरिकांच्या घरांचे व मालमत्तेचे संरक्षण होणार आहे. दरवर्षी पावसाळ्यात पाणी साचणे, माती घसरणे तसेच ये-जा करताना निर्माण होणाऱ्या समस्यांमुळे नागरिकांना मोठ्या गैरसोयींना सामोरे जावे लागत होते. या पार्श्वभूमीवर हे काम अत्यंत उपयुक्त व सुरक्षिततेच्या दृष्टीने महत्त्वाचे असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

उद्घाटनप्रसंगी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थित नागरिकांशी थेट संवाद साधत शासन व शिवसेनेच्या माध्यमातून सुरू असलेल्या विविध विकासकामांची माहिती दिली.

‘‘विकास हाच आमचा ध्यास असून, सामान्य नागरिकांच्या मूलभूत सुविधा सक्षम करण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरू आहेत. रस्ते, संरक्षण भिंती, पाणीपुरवठा व इतर नागरी सुविधा या सर्व गोष्टींना प्राधान्य देण्यात येत आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी आणि सोयीसाठी निधीची कमतरता पडू दिली जाणार नाही,’’ असे स्पष्ट मत आमदार खोतकर यांनी व्यक्त केले.

यावेळी नागरिकांनी आपल्या विविध समस्या व मागण्या आमदार खोतकर यांच्यासमोर मांडल्या. त्या समस्या लवकरात लवकर मार्गी लावण्याचे आश्वासन देत, विकासकामांमध्ये नागरिकांचा विश्वास आणि सहभाग महत्त्वाचा असल्याचेही त्यांनी नमूद केले.

या उद्घाटन सोहळ्यास शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख भास्करराव अंबेकर, शिवसेना संपर्कप्रमुख पंडितदादा भुतेकर, जिल्हाप्रमुख भगवानराव मान्टे, दिलीप रोहीनकर, दिलीप ठाकूर, सराफ काका, पी. जी. पाटील, तेलंगे सर, खेडवाल साहेब, बायस साहेब, चमनसिंग ठाकूर, जगधने, ममता खरात, मिराताई मोहिते, कोरडे ताई, मंदाताई तेलंगे, खेत्रे ताई, रोहीनकर ताई आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व मोठ्या



भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख महिला आघाडी उज्वलाताई फोपलिया यांच्यासह सखाराम लंके, दीपक हवाले, लखन कनिशे, स्वप्निल भिसे, बबन शेळके, आक्कु भैय्या, निरज मंत्री, दिलीप मिठे, कोरडे साहेब, संतोष शेठ, फोपलिया दवणे, सखाराम लंके,महाविर जांगीड, एकनाथ पडुळ सचिन शर्मा, खडागळे साहेब, मनवर साहेब, भोला कांबळे, रविकांत संख्येने नागरिक उपस्थित होते. या विकासकामामुळे व्यंकटेश नगर परिसरातील नागरिकांनी समाधान व्यक्त करत आमदार अर्जुनराव खोतकर यांचे आभार मानले.

# जालन्यात पुन्हा रक्तपात! धारदार शस्त्राने तरुणाचा निर्घृण खून

## मध्यरात्री शहर हादरले; एक आरोपी पोलिसांच्या ताब्यात

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात गुन्हेगारीने अक्षरशः हैदोस घातला असून, धारदार शस्त्राने तरुणाचा निर्घृण खून करण्यात आल्याची धक्कादायक घटना मध्यरात्री घडली आहे. या रक्तरंजित घटनेमुळे जालना शहर पुन्हा एकदा हादरले असून कायदा व सुव्यवस्थेचे तीनतेरा वाजल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे.

काल रात्री सुमारे दोनच्या सुमारास ओम हॉस्पीटलजवळील चौकात ही थरारक घटना घडली. शाहेद सगीर शेख (रा. जालना) या तरुणावर जुन्या वादातून राहील कलीम शेख याने धारदार शस्त्राने सपासप वार केल्याची माहिती समोर आली आहे. अचानक झालेल्या या प्राणघातक हल्ल्यात शाहेद गंभीर जखमी झाला. त्याला तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र उपचार सुरू होण्यापूर्वीच त्याचा मृत्यू झाला.

घटनेची माहिती मिळताच सदर बाजार पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. घटनास्थळाचा पंचनामा करण्यात आला असून मृतदेह ताब्यात घेऊन शासकीय सामान्य रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविण्यात आला. या घटनेनंतर जिल्हा सामान्य रुग्णालय परिसरात नागरिकांची मोठी गर्दी जमली होती.

मयत शाहेद शेख यांच्या भावाने दिलेल्या तक्रारीवरून सदर बाजार पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणातील संशयित आरोपी राहील कलीम शेख (रा. मंगळ बाजार, जालना) याला पोलिसांनी ताब्यात घेतल्याची माहिती पोलीस निरीक्षक संदीप भारती यांनी दिली आहे. प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, जालना शहरात खून, मारहाण, टोळीयुद्ध, दहशत अशा घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असून, शहरातील कायदा **पान २ वर**



# शिवजयंती निमित्त आज बैठक

**जालना । प्रतिनिधी -** येथील शिवछत्रपती सांस्कृतिक क्रीडा मंडळाच्या वतीने आगामी छत्रपती शिवाजी महाराज जयंतीच्या पार्श्वभूमीवर सर्व पक्षीय शिवजन्मोत्सव -२०२६ ची

कार्यकारिणी गठित करण्यासाठी रवीवार ( ता. ०८) दुपारी ०३.०० वा. बस स्थानका जवळील राऊत नगर परिसरात असलेल्या राजमाता गड येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले आहे.

शिवजन्मोत्सव साजरा करण्याबाबत रूपरेषा ठरवली जाणार आहे तरी शिवप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन अंकुशराव देशमुख, ,अंकुशराव राऊत, सर्जेराव जाधव, रविंद्र राऊत सतीश जाधव, रमेश गौरक्षक,मेश देहेडकर, पारस यादव ,सुभाष देविदान , विजय पंडित,विशाल बनकर,ॲड.रविंद्र डुरे, गणेश सुपारकर,ॲड.अर्जुन राऊत, अंकुश पचफुले विलास तिकांडे, शिवप्रताप चितलकर, यांनी केले आहे.

# संपादकीय

पान

## पत्रकारितेवर तक्रारींचे शस्त्र : लोकशाहीसाठी धोक्याची घंटा

जिल्हा परिषद बांधकाम विभागातील कथित गैरकारभारासंदर्भात माहिती घेत असतांना एका पत्रकारावर 'शासकीय कामात अडथळा' केल्याचा आरोप करत तक्रार दाखल करण्यात आल्याची घटना अत्यंत गंभीर आणि चिंताजनक आहे. ही केवळ एक तक्रार नसून, पत्रकारांच्या स्वातंत्र्यावर आणि लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेला थेट आघात आहे विशेष बाब म्हणजे, या तक्रारीच्या चार दिवस आधीच संबंधित शासकीय गुत्तेदाराच्या भावाविरोधात त्याच पत्रकाराने कदीम जालना पोलीस ठाण्यात जीवे मारण्याची धमकी व शिवीगाळ केल्याबाबत तक्रार दाखल केली होती. या कालानुक्रमामुळे एकच गंभीर प्रश्न उपस्थित होतो ''पत्रकाराच्या तक्रारीचा बदला घेण्यासाठीच प्रतितक्रार दाखल करण्यात आली का?'' या प्रकरणातील सर्वात महत्त्वाचा मुद्दा म्हणजे तक्रारदार स्वतः शासकीय गुत्तेदारही नाही, तर गुत्तेदाराचा भाऊ आहे. कायद्याच्या दृष्टीने शासकीय गुत्तेदार लोकसेवक ठरत नाही त्याचा भाऊ तर अजिबातच शासकीय कर्मचारी किंवा लोकसेवक नाही. अशा परिस्थितीत 'शासकीय कामात अडथळा' हा आरोप नेमका कुणाच्या कामात आणि कशा स्वरूपाचा? हा आरोप कायदेशीर कसोटीवर टिकणारा आहे का? याबाबत कायदे तज्ज्ञांनीही शंका व्यक्त केली आहे. तक्रारीत भारतीय दंड संहिता १८६०, माहिती तंत्रज्ञान कायदा २००० आणि भारतीय न्याय संहिता २०२३ मधील विविध कलमांचा उल्लेख आहे. मात्र, ही कलमे परस्पर विसंगत असून त्यांचा एकमेकांशी थेट संबंध दिसून येत नाही. यामुळे, कायदेशीर अभ्यास न करता, केवळ दबाव निर्माण करण्याच्या हेतूने ही तक्रार घाईघाईने तयार करण्यात आली आहे का? असा संशय निर्माण होतो. तक्रारीत थेट एफआयआर नोंदविण्याचे आदेशात्मक स्वरूपातील उल्लेख आढळतात. यामुळे तक्रारदार स्वतःला कायद्यापेक्षा वरचढ समजतो आहे का? पोलीस व जिल्हा प्रशासनावरही अप्रत्यक्ष दबाव टाकण्याचा हा प्रयत्न नाही ना? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. पत्रकार हा समाजाचा प्रतिनिधी असतो. माहिती संकलन करणे, प्रश्न विचारणे आणि सत्य जनतेसमोर मांडणे हा त्याचा घटनात्मक अधिकार आहे. हा अधिकार बजावताना पत्रकारावर गुन्हे दाखल करण्याचा प्रयत्न होत असेल, तर तो लोकशाहीच्या चौथ्या स्तंभावर झालेला थेट हल्ला मानावा लागेल. जालन्यातील पत्रकार संघटनांनी या प्रकरणाची गंभीर दखल घेतली असून, ही बाब वैयक्तिक वादापुरती मर्यादित नसून संपूर्ण पत्रकारितेच्या स्वातंत्र्याशी निगडीत असल्याचे स्पष्ट केले आहे. पत्रकारांनी एकसंध होऊन अशा दबावतंत्राविरोधात उभे राहण्याची गरज असल्याचा ठाम सूर व्यक्त केला जात आहे. महाराष्ट्रात पत्रकार संरक्षण कायदा अस्तित्वात असतानाही, अशा घटनांमध्ये त्याची प्रभावी अंमलबजावणी होत नसल्याची टीका पुन्हा एकदा समोर येत आहे. या प्रकरणात तक्रारीची सखोल व निष्पक्ष चौकशी व्हावी पत्रकाराला धमकी दिल्याप्रकरणी गुत्तेदार व त्याच्या भावाविरोधात तात्काळ गुन्हा दाखल व्हावा दोन्ही बाजूंची स्वतंत्र चौकशी करावी अशी स्पष्ट मागणी होत आहे. आता सर्वांचे लक्ष कदीम जालना पोलीस ठाण्याकडे लागले आहे. पत्रकाराच्या तक्रारीवर तात्काळ गुन्हा दाखल होतो की प्रकरण चौकशीच्या नावाखाली लटकवले जाते, यावरून प्रशासनाची खरी भूमिका स्पष्ट होणार आहे. जर पत्रकारांवर दबाव टाकण्यासाठी खोट्या तक्रारींचा मार्ग स्वीकारला जात असेल, तर तो लोकशाहीसाठी अत्यंत धोकादायक संकेत आहे. वेळीच हस्तक्षेप करून सत्य बाहेर आणणे आणि पत्रकारांच्या अधिकारांचे संरक्षण करणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून लोकशाही टिकवण्याची गरज आहे.

पान १ वरुन

### जालन्यात पुन्हा ...

व सुव्यवस्था पूर्णपणे ढासळल्याची तीव्र भावना नागरिकांतून व्यक्त होत आहे. मध्यरात्री भरवस्तीत घडलेल्या या हत्येमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून पोलिस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवरही गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

जालन्यात वाढणाऱ्या गुन्हेगारीवर पोलिस प्रशासन कठोर कारवाई करणार की शहर असेच रक्तरंजित घटनांचे साक्षीदार राहणार? असा थेट सवाल आता नागरिक विचारू लागले आहेत.

# पाकचा संघ स्पर्धेत खेळो अथवा न खेळो.. कोण बनणार चॅम्पियन..?

भारत-श्रीलंकेच्या रत-श्रीलंकेच्या संयुक्त यजमानपदाखाली होणाऱ्या आयसीसी टी-२० विश्वचषक २०२६ स्पर्धेत भाग घेण्यासाठी जगातले २० संघ सज्ज झाले आहेत. आजपासून या विश्वचषकाच्या साखळी फ ेऱ्यांना सुरुवात होत आहे. यजमान भारतीय संघ या स्पर्धेत गतविजेत्याच्या रुपात दिमाखात प्रवेश करेल. भारताने २०२४ मध्ये वेस्ट इंडिज आणि अमेरिकेने संयुक्तपणे आयोजित केलेला टी-२० विश्वचषक जिंकला होता. तत्कालीन कर्णधार रोहित शर्माच्या नेतृत्वाखाली जिंकलेला हा विश्वचषक अनेक अर्थानी वैशिष्ट्यपूर्ण ठरला होता. कारण, त्याआधी अवघ्या काही महिन्यांपूर्वी २०२४ मध्ये भारतातच झालेल्या एकदिवसीय विश्वचषकाच्या अंतिम सामन्यात भारतीय संघाला ऑस्ट्रेलियाकडून पराभव स्वीकारावा लागला होता. संपूर्ण स्पर्धेत एकही सामना न गमावणारा भारतीय संघ तो एकदिवसीय विश्वचषक सहज जिंकेल असे चाहत्यांना ठामपणे वाटत होते. हा सामना बघायला भारत आणि ऑस्ट्रेलियाचे पंतप्रधानदेखील स्टेडियममध्ये उपस्थित होते. परंतु, भारतीय संघ तो सामना हरला. ही कसर २०२४ च्या टी-२० विश्वचषकातून भरून निघाली.

टी-२० विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात, आजपर्यंत कोणत्याही संघाला सलग दोन टी-२० विश्वचषक जिंकता आलेले नाहीत. भारतीय संघ हा विश्वचषक जिंकून नवा रेकॉर्ड प्रस्थापित करेल का याकडे अर्थातच सगळ्या भारतीयांचे लक्ष असेल. भारतीय संघाच्या बाबतीत सांगायचे झाल्यास रोहित शर्मा, विराट कोहली, रवींद्र जडेजा, ऋषभ पंत आदी टी-२० स्पेशलिस्ट खेळाडूंची जागा नवीन प्रतिभावंत खेळाडूंनी घेतली आहे. या संघात २०२४ च्या टी-२० विश्वचषक विजेत्या संघाचा भाग असलेले ८ खेळाडू आहेत, तर ७ नवीन नव्या दमाचे खेळाडू आहेत. यावेळचा टी-२० विश्वचषक भारतीय संघ सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वाखाली खेळेल. गेल्या टी-२० विश्वचषकानंतर भारतीय संघाने एकही मालिका गमावलेली नाही हे विशेष. भारतीय संघाची फलंदाजी, गोलंदाजी, क्षेत्ररक्षण सगळेकाही फॉर्मात आहे. भारतीय संघात जगातला नंबर वन टी-२० फलंदाज अभिषेक शर्मा आणि नंबर वन गोलंदाज वरुण चक्रवर्ती यांचाही समावेश आहे. त्यामुळे भारतीय संघ या विश्वचषकाचा प्रमुख दावेदार मानला जात आहे. त्याशिवाय ऑस्ट्रेलिया, दक्षिण आफ्रिका, इंग्लंड, न्यूझीलंड, पाकिस्तान या संघांवरही सगळ्यांची नजर असेल. तर, स्पर्धेत अफगाणिस्तान, वेस्ट इंडिज, आयर्लंड, यूएई, यूएसए, नेदरलँड्स, स्कॉटलँड्स, झिम्बाब्वे आदी अंडरडॉग संघही आहेत. गेल्या वेळच्या विश्वचषकात यूएसएने पाकिस्तानला हरवून सगळ्यांचेच लक्ष वेधून घेतले होते. या वेळचा विश्वचषक सुरू होण्याआधी वादाच्या मालिकांना सुरुवात झाली होती. गेल्या वर्षी पाकिस्तान यजमान असलेल्या चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारताने सुरक्षेच्या कारणांमुळे पाकिस्तानात जायला नकार दिला होता. त्याचा राग मनात धरून असलेल्या पाकिस्तानने भारतातली विश्वचषक स्पर्धा कशी खराब करता येईल, यासाठी बरेच प्रयत्न केले. सुरुवातीला सुरक्षेचा हवाला देत पाकिस्तानने भारतात खेळण्यास नकार दिला, तेव्हा भारताने श्रीलंकेसोबत यजमानपद वाटून घेत पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत हलवले. पाकिस्तान सेमीफायनल किंवा फायनलमध्ये जरी आला, तरी त्यांचे सामने श्रीलंकेत होतील, असे नियोजन करत पाकिस्तानचा विरोध मोडीत काढला. यानंतर कटकारस्थान करत पाकिस्तानने बांगलादेशला भारतात न खेळण्यासाठी उकसवले. पाकिस्तानप्रमाणेच आपलेही सर्व सामने श्रीलंकेत हलवा अशी मागणी बांगलादेश करू लागला. तेव्हा खेळायचे तर खेळा नाहीतर स्पर्धेबाहेर व्हा म्हणत आयसीसीने बांगलादेशला सरळ विश्वचषकाच्या स्पर्धेतूनच चालते केले आणि त्यांच्याजागी स्कॉटलँडच्या संघाला स्पर्धेत थेट प्रवेश दिला. यामुळे बांगलादेशची जिरली असली, तरी पाकिस्तान अजूनही नरमलेला नाही. बांगलादेशची स्पर्धेतून हकालपट्टी केल्याचा निषेध म्हणून पाकिस्तानने भारतासोबतच्या सामन्यावर बहिष्कार घालण्याचे ठरवले आहे. भारत-पाकिस्तान-बांगलादेशचा मुद्दा आता क्रिकेटपुरता मर्यादित राहिलेला नाही. बांगलादेशमध्ये भारतविरोधी नारेबाजी करत अल्पसंख्याकांना लक्ष्य केले जात आहे. तत्कालीन पंतप्रधान शेख हसीना यांना पदच्युत केल्यापासून चीन व पाकिस्तानधार्जिणे बांगलादेशी सरकार सातत्याने भारतविरोधी भूमिका घेताना दिसते. त्यांना अर्थातच पाकिस्तानकडून वेळोवेळी फूस दिली जात आहे.




कोलकाता नाईट रायडर्स संघाने बांगलादेशी खेळाडू मुस्तफिजूर रेहमानला बाजूला करताच बांगलादेशला भारतविरोधात आगपाखड करायला निमित्त मिळाले होते. आयसीसीने बांगलादेशच्या मुसक्या आवळल्या असल्या, तरी पाकिस्तानचा थयथयाट अजून कमी झालेला नाही. नियमानुसार कुठल्याही संघाला एक सामना न खेळण्याची मुभा असते, त्याच नियमाचा फायदा उचलून पाकिस्तानने भारतावर बहिष्काराचे अस्त्र उगारले आहे. भारत-पाक क्रिकेट सामना म्हणजे हायव्होल्टेज ड्रामा. हा सामना रद्द झाल्यास ब्रॉडकास्टर्सना कोट्यवधी रुपयांचा तोटा होऊ शकतो. तोट्याच्या वसुलीसाठी ब्रॉडकास्टर्सने आयसीसीकडे दाद मागितल्यास नुकसानीची भरपाई करण्यासाठी आयसीसी पाक क्रिकेट बोर्डाचा निधी थांबवू शकते, दंड आकारू शकते किंवा आंतरराष्ट्रीय सामन्यांवरही बंदी घालू शकते, याची पाक क्रिकेट बोर्डाला चांगलीच जाणीव आहे. पाक बोर्डाने अद्याप सामना न खेळण्याबाबत कुठलेही अधिकृत पत्र आयसीसीला दिलेले नाही. बांगलादेशमध्ये १२ फेब्रुवारीला निवडणुका व्हायच्या आहेत, तोपर्यंत बहिष्काराच्या नावाखाली पाक झुलवत राहील आणि ऐनवेळी सामना खेळेल असाही एक तर्क दिला जातोय. असा प्रकार त्यांनी आशिया चषकात अफगाणिस्तानविरुद्धच्या सामन्यात केला होता. भारताने हात न मिळवल्याच्या रागातून तासभर उशिराने पाकचा संघ सामना खेळायला उतरला होता. त्याची पुनरावृत्ती होण्याची दाट शक्यता आहे. पाकचा संघ स्पर्धेत खेळो अथवा न खेळो भारतीय संघाला त्याने काहीही फरक पडणार नाही. कारण या रणसंग्रामात राजकीय डावपेचांपेक्षा क्रिकेटच्या मैदानावर प्रत्यक्षात कोण किती सरस खेळ खेळतो यावर सामन्याचा निकाल अवलंबून असेल. भारतीय संघ पूर्ण तयारीनिशी त्यासाठी तयार आहे.

# सध्याच्या शिक्षणाची ढासळती गुणवत्ता अन् भविष्यातील शिक्षक व शिक्षणाची अवस्था

शिक्षण म्हणजेच गुणवत्ता वृद्धी. शैक्षणिक गुणवत्तेची व्याख्या आणि मोजमाप करणे, हे तसे अवघड व गुंतागुंतीचे काम. जगात शिक्षणाच्या इतिहासात शिक्षण गुणवत्तापूर्ण असायाल हवे असा विचार सातत्याने मांडण्यात येतो. शिक्षणाच्या इतिहासाची पाने चाळली तर शिक्षण गुणवत्तापूर्ण होते असे फारसे दिसत नाही. खरं तर गुणवत्ता म्हणजे नेमके काय? हे व्याख्येत बांधण्याचा प्रयत्न आजवर अनेकांनी केला आहे. मात्र, त्या व्याख्येत अपेक्षांची भिन्नता दिसून येते. शिक्षणाच्या प्रक्रियेत आपण गुणवत्तेचा जो विचार करतो आहोत आणि त्यात गुणवत्तेची जी कल्पना आहे ती व्यक्ती सापेक्ष संकल्पना आहे. समाज जसा जसा गतीमान होत जातो त्याप्रमाणे शिक्षणाकडून देखील अपेक्षा सतत बदलत जात आहेत. जगभरात होणारी संशोधने, औद्योगिक विकास, समाजात रूजणारे विज्ञान, बदलणारी राजकीय विचारधारा यानुसारही शिक्षणाकडून अपेक्षा बदलत जातात

वर्तमानातील अपेक्षा पूर्ण करण्याचा प्रयत्न शिक्षणाकडून होण्याची गरज असते. मात्र, त्या अपेक्षा शिक्षणातून साध्य होतील असे घडत नाही. वर्तमानातील अपेक्षा शिक्षणाकडून पूर्ण झाल्या नाही तर शिक्षण गुणवत्तापूर्ण नाही असे मानले जाते. त्यामुळे शिक्षण गुणवत्तापूर्ण करण्यासाठीचे प्रयत्न व्यवस्थेत सातत्याने होत असतात. प्रयत्न जसे होत जातात त्याप्रमाणे अपेक्षा पुन्हा उंचावत जातात हेही वास्तव आहे. शिक्षणातून अपेक्षा असतात आणि त्या पूर्ण करण्यासाठी काळ लागत असतो. त्यामुळे वर्तमानातील अपेक्ष पूर्ण करण्यासाठी भविष्यात वाट चालावी लागते. वाट जशी चालत जातो त्याप्रमाणे अपेक्षा पुन्हा पुन्हा उंचावत जातात. त्यामुळे शिक्षणात अपेक्षां पूर्णत्वाला जाण्याची शक्यता कधीच नसते.

आज ब-याच शाळा ओसाड पडत आहे. कारण तिथे शिक्षकांचा तुटवडा पडत आहे. कुठे ७ वर्गासाठी १ किंवा २ तर कुठे ५ वर्गासाठी १ च शिक्षक आहे. त्यामुळे शिक्षणाची अपेक्षापूर्ती होत नाही. यामुळे शिक्षणाची गुणवत्ता ढासळत चालली आहे. केवळ हेच कारण नाही, तर बरेच शिक्षक आपल्या शिक्षकीपेशाला काळीमा फासणारे आहेत. ब-याच शिक्षकांच्या हालचालीवरून, व्यवहारावरून एकंदरीत त्यांच्या वर्तवणूकीवरून ते विद्यार्थ्यांचं काय भविष्य घडवतील हा प्रश्न सतत मनाला सतावतो. यातीलच एक कारण पुढे करून शिक्षक पण शिकविण्यास पात्र असावे म्हणून राज्य शासनाने शिक्षक पात्रता परीक्षा घेणे सुरु केले आहे. विद्यार्थ्यांना घडविणारे शिक्षकवृंद पण 'तावून सुलाखून' निघणार असतील तर उत्तम. हा त्यामागचा हेतू शासनाने ठेवला.

उद्याची पिढी घडवणा-या राज्यातील प्राथमिक व उच्च प्राथमिक शिक्षक पात्रतेसाठी महत्त्वाची असलेली महाराष्ट्र शिक्षक पात्रता परीक्षा (महाटीईटी) च्या २०२५ मध्ये झालेल्या अंतिम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला. मात्र, या निकालाने राज्यातील अनेकांच्या अपेक्षांवर पाणी फेरले गेले आहे. हा निकाल शिक्षण क्षेत्रास चांगलाच धक्का देणारा ठरला असून राज्यातील शिक्षक गुणवत्तेवर गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या परीक्षेत केवळ ११.२८ टक्के शिक्षक उमेदवार उत्तीर्ण झाले. ४.७५ लाख शिक्षकांपैकी ३ लाख ९६ हजार शिक्षक अनुत्तीर्ण झाले ही बाब धक्कादायक आहे. केवळ धक्कादायकच नसून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांच्या दारुण परिस्थिवर प्रकाश टाकणारी आहे. सर्वाधिक कन्नड माध्यमाचे १५ टक्के तर मराठीचे १२.२८ टक्के, हिंदीचे १२.१९ टक्के तर तेलुगू माध्यमाचे याच सरासरीच्या आसपास उमेदवार उत्तीर्ण झाले. यात उर्दू, इंग्रजी आणि विशेषतः गुजराती माध्यमाचा निकाल सर्वात कमी ३.४४ टक्के लागला.

क्षेत्र कोणतेही असो मग ते आयटीचे असो की वैद्यकीय. झपाट्याने होणा-या बदलांना सामोरे जाताना स्वतःला कालसुसंगत राखणे हे आवाहन झाले आहे. एकदा डीएड झालो आणि शिक्षक म्हणून चिकटलो की मोकळे ही ब-याच शिक्षकांची मानसिकता...आता वर्षानुवर्ष मी कुठल्याही परीक्षेला कशाला सामोरे जायचे? या भावनेतून टीईटी परीक्षेला काही शिक्षक संघटनांचा विरोध राहिला. अन्य क्षेत्रात स्वतःला अपडेट ठेवण्याकरिता धडपड सुरु असताना शिक्षकांनी अशी भूमिका घेणे हे योग्य नव्हेच. एआयमुळे वेगवेगळ्या क्षेत्रात झपाट्याने बदल होत आहेत. भविष्यात शिक्षण क्षेत्रही त्यापासून वेगळे नसेल. त्यामुळे आपल्या बुद्धीला तावूनसुलाखून पाहण्यात काहीच गैर नाही.

मात्र, ज्यांनी शिकविण्याकरिता अजून खडू हातात धरलाही नाही, अशा शिक्षकांची या परीक्षेत अनुत्तीर्ण झाल्याची मोठी संख्या आहे. आता जे उत्तीर्ण झाले ते सध्या शिक्षक असून ही परीक्षा दिल्याखेरीज आपली नोकरी कायम होणार नाही, अशी टांगती तलवार मानगुटीवर कायम असल्याने ज्यांनी परीक्षा दिली तेच यात उत्तीर्ण झाल्याने निकाल ११ टक्क्यांच्या आसपास लागला. यावरून भविष्यातील शिक्षक व शिक्षण यांची अवस्था कशी भीतीदायक आहे, याचाच साक्षात्कार होतो. शिक्षक होण्याकरिता धडपडणा-यांना अपयश येण्याचे मुख्य कारण हे सध्याच्या कंत्राटी शिक्षणात आहे. अनेक युवक-युवती वेळप्रसंगी अन्य छोटी-मोठी कामे करणे पसंत करतात. मात्र, शिक्षक होण्याला तिलांजली वाहतात. अत्यल्प वेतन देऊन अनेक शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षकांची पिळवणूक होते. एका रकमेवर स्वाक्षरी घ्यायची आणि अत्यल्प रक्कम हातावर टेकवायची, असे प्रकार अनेक शैक्षणिक संस्थामध्ये सर्रास होत असल्याचे दिसून येते. त्यामुळे अन्य कुठल्याच क्षेत्रात पाय रोवता आला नाही तोच शेवटचा पर्याय म्हणून या क्षेत्राकडे वळतो, असे म्हटले तर ते अयोग्य ठरणार नाही. याच भीतीपोटी असले प्रकार सहन करण्यावाचून पर्याय नसतो.

ज्यांना निवृत्तीला केवळ ६ महिने बाकी आहेत. अशा शिक्षकांनाही ही परीक्षा सक्तीची केली आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निकालामुळे ही परीक्षा अनिवार्य केली गेली. एकीकडे अशैक्षणिक कामाच्या बोजाने शिक्षक त्रस्त आहेत. शालेय पोषण आहारातील तांदुळाचा हिशेब ठेवण्यापासून तंबाखुमुक्त अभियानाची माहिती सरकारला भरून देण्यापर्यंत जवळपास शंभरेक कामे शिक्षकांना लावली आहेत. सरकारचे अशैक्षणिक कामे शिक्षकांवर लादण्याचे धोरण असमर्थनीय आहे. यामुळे शिक्षकांचे मूळ कामाकडे दुर्लक्ष होत आहे. या कामांच्या बोजाने शिक्षक अक्षरशः वाकले आहेत. शिवाय शिक्षकांकरिता वेगवेगळे प्रशिक्षण आयोजित केले जाते. त्यामुळेही या परीक्षेला विरोध होत आहे. टीईटी परीक्षेची काठिण्य पातळी जास्त आहे. दिलेल्या ४ पर्यायातून १ पर्याय निवडायचा असतो. शिवाय निगेटिव्ह मार्किंग (नकारात्मक गुण पद्धत) आहे. त्यामुळे अनेकदा शिक्षकांचा गोंधळ उडतो. परिणामी त्यांच्या पदरात भोपळा पडतो. जसे टीईटी परीक्षेला विरोध करणा-यांचे समर्थन करता येत नाही तसेच टीईटीची सरसकट सक्ती ही देखील योग्य म्हणता येत नाही. विद्यार्थ्यांकडून गुणवत्तेची व पैकीच्या पैकी गुणांची अपेक्षा करणा-या शिक्षकांनी टीईटी परीक्षेत अधिक चमकदार कामगिरी करून आपली गुणवत्ता सिद्ध करावी ही अपेक्षा बाळगणे अचूक आहे.

**सुनील शिरपुरे कमळवेल्ली,यवतमाळ**
**भ्रमणध्वनी-७०५७१८५४७९**

# संत श्री गजानन महाराज !

भक्तांच्या उद्धारासाठी गावोगावी भ्रमंती करणारे आणि अनेक चमत्कार करून भक्तांची श्रद्धा वाढवणारे संत श्री गजानन महाराज !

माघ कृष्ण पक्ष सप्तमी, शके १८००, म्हणजेच २३.२.१८७८ या दिवशी श्री गजानन महाराज ऐन तारुण्यात शेगाव (जिल्हा बुलढाणा) येथे प्रकट झाले. त्यांची दृष्टी पूर्णतः अंतर्मुख होऊन नासिकाग्रावर स्थिर झालेली होती. नेहमीच दिगंबर अवस्थेत असणाऱ्या महाराजांना कुणी कपडे घातलेच, तर ते लगेच काढून फेकून देत किंवा गर्दीतील लोकांना वाटून टाकत असत. त्यांच्या आरंभीच्या वेशानुसार त्यांच्या अंगात जुनी बंडी, हातात कमंडलूसारखा भोपळा आणि स्वहस्ते सिद्ध केलेली कच्च्या मातीची एक चिलीम होती.

महाराजांचे सत्यस्वरूप कोणताही छायाचित्रक टिपू न शकणे-

त्यांचे सत्यस्वरूप कोणताही छायाचित्रक (कॅमेरा) टिपू शकला नाही, हे त्यांचे वैशिष्ट्य होते. प्रत्येक वेळी काढलेले त्यांचे छायाचित्र वेगळेच निघायचे; म्हणून महाराजांचे एकही छायाचित्र दुसऱ्या छायाचित्राशी जुळत नाही.

महाराजांचा द्रष्टेपणा !

प्रकट दिनीच त्यांनी अन्न आणि पाणी वाया घालवू नका, असा संदेश दिला. त्यांच्या या शिकवणुकीची आवश्यकता आज भासतच आहे. संत किती द्रष्टे असतात ? याचीच ही प्रचीती आहे.

सर्व विषयांत पारंगत असणारे श्री गजानन महाराज !

महाराजांना मराठी, इंग्रजी, हिंदी, संस्कृत आदी भाषा अवगत होत्या, तसेच सर्व विषयांचे ज्ञानही होते. समोरच्या व्यक्तींची योग्यता ओळखून महाराज त्या व्यक्तीशी संभाषण करत असत. खरा जिज्ञासू समोर आल्यास त्याची जिज्ञासा त्यांच्याकडून शमवली जात असे. कला आणि संगीत यांचीही त्यांना आवड होती. ते विविध रागांत स्वतः भजने आणि पदे म्हणत असत. त्यांना गातांना पाहून खरा गायकही प्रभावित होत असे. त्यांचा वेद आणि ऋचा यांचाही दांडगा अभ्यास होता.

महाराजांच्या आवडत्या गोष्टी

भोलानाथ दिगंबर हे दुःख मेरा हरो रे । चंदन, चावल, बेलकी पातियां शिवजीके माथे धरो रे ।। हे संत मीराबाईचे पद महाराजांना फारच आवडायचे. हेच पद ते सतत म्हणायचे.

महाराजांना लाकडी पलंगावर बसायला फार आवडत असे; म्हणून शेगावी त्यांचा हा पलंग संस्थानाकडून भक्तांच्या दर्शनार्थ ठेवला आहे. गण गण गणांत बोते असे ते सतत गुणगुणायचे; म्हणूनही लोक त्यांना गजानन महाराज असे म्हणतात.

भक्तांच्या उद्धारासाठी गावोगावी भ्रमंती करणे !

भक्तांच्या उद्धारासाठी त्यांची गावोगावी सारखी भ्रमंती चालूच असायची. कुणीही त्यांना आपल्या घरी थांबवून ठेवू शकत नसे.

महाराजांनी केलेले विविध चमत्कार !

त्यांच्या आध्यात्मिक मार्गदर्शनात अनेक चमत्कारांचा अनुभव अनेकांनी वेळोवेळी घेतला आहे. दुखण्यातून बरे करणे, कोरड्या विहिरीला पाणी आणणे, कावळ्यांना पुन्हा न येण्यास सांगणे, आगगाडी रोखून धरणे, भक्तांना नर्मदा नदीचे दर्शन घडवणे, महारोग्याचा रोग बरा करणे, द्वाड गाय आणि घोडा यांना शांत करणे, भक्तांना विठ्ठलाचे अन् रामदास स्वामींचे दर्शन घडवणे, पितांबर या शिष्याचा उद्धार करणे, वाळलेल्या आंब्याच्या झाडास हिरवी पाने आणणे, जळत्या पलंगावर बसणे, मधमाशांनी चावा घेऊनही अंग सुरक्षित असणे, ब्रह्मगिरीच्या गोसाव्याचे गर्वहरण करणे, ऊसाच्या काठीचा मार सहन करणे, पहिलवानाला पाय उचलू न देणे, चिलीमसमोर नुसती काडी धरताच चिलीम पेटणे, असे चमत्कार भक्तांनी अनुभवले आहेत.

देश-विदेशातील भक्तांना महाराजांच्या कृपाशीर्वादाची अनुभूती देणारी विदर्भाची पंढरी ! श्री गजानन महाराजांच्या संदर्भात लक्षावधी लोक प्रतिदिन अनुभूती घेत असल्यानेच त्यांच्या दर्शनार्थ शेगावात भक्तांची मुग्यांसारखी गर्दी होत आहे. विदर्भातच नव्हे, तर संपूर्ण महाराष्ट्रात आणि विदेशातही महाराजांचे भक्त त्यांच्या कृपावर्षावाचा नित्य अनुभव घेत आहेत. हीच खरी लीला ! त्यामुळे आजही शेगावचे गजानन महाराज मंदिर हे विदर्भाची पंढरी म्हणून गणले जाते. शेगावी जाताच श्री महाराजांच्या चरणी मस्तक विनम्र होते. गजानन महाराज की जय असा जयघोष करून लोक स्वतःला धन्य समजतात.

**संकलन- श्री. दत्तात्रेय वाघूळदे, सनातन संस्था**
**संपर्क- ९२८४०२७१८०**

# अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली बदनामी खपवून घेणार नाही - उच्च न्यायालय

**जालना । प्रतिनिधी -** अभिव्यक्ती स्वातंत्र्य हा एक अत्यंत मौल्यवान घटनात्मक अधिकार असला तरी, त्याच्या नावाखाली समाज माध्यमांवर (सोशल मीडियावर) बदनामीकारक, अपमानजनक किंवा द्वेषपूर्ण मजकूर प्रकाशित करण्याचा अधिकार कोणालाही मिळत नाही, असे महत्त्वपूर्ण निरीक्षण दिल्ली उच्च न्यायालयाने नोंदवले आहे. न्यायमूर्ती ज्योती सिंह यांनी फिजिक्सवाला लिमिटेड विरुद्ध निखिल कुमार सिंह आणि इतर या खटल्यात हा निकाल दिला.

न्यायालयाने स्पष्ट केले की, अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा वापर इतरांच्या हक्कांची पायमल्ली करण्यासाठी केला जाऊ शकत नाही, विशेषतः प्रतिष्ठेच्या अधिकारावर गदा आणता येणार नाही. प्रतिष्ठेचा अधिकार हा भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत जीवनाच्या अधिकाराचा एक अविभाज्य भाग म्हणून ओळखला जातो. अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा अधिकार आणि प्रतिष्ठेचा अधिकार यांच्यात संतुलन साधणे हे घटनात्मक योजनेचे मूळ आहे, असेही न्यायालयाने नमूद केले.

सदर प्रकरण ऑनलाइन शिक्षण मंच फिजिक्सवाला आणि त्यांचे माजी कर्मचारी निखिल कुमार सिंह यांच्यातील आहे. निखिल कुमार सिंह यांनी फिजिक्सवाला विरोधात समाज माध्यमांवर काही अपमानजनक आणि बदनामीकारक पोस्ट आणि व्हिडिओ प्रसारित केले होते. यावर फिजिक्सवालाने न्यायालयात दाद मागितली होती. प्रतिवादीच्या वकिलांनी अभिव्यक्ती स्वातंत्र्याच्या अधिकाराचा बचाव करण्याचा प्रयत्न केला, परंतु न्यायालयाने त्यांचा युक्तिवाद फेटाळून लावत संबंधित आक्षेपार्ह मजकूर त्वरित काढून टाकण्याचा किंवा त्यावर बंदी घालण्याचा अंतरिम मनाई हुकूम दिला.

या निकालावर प्रतिक्रिया देताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ॲड. महेश धन्नावत यांनी न्यायालयाच्या भूमिकेचे स्वागत केले. ते म्हणाले, ''दिल्ली उच्च न्यायालयाचा हा निर्णय डिजिटल युगात अत्यंत महत्त्वाचा आहे. समाज माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे कोणत्याही व्यक्तीची किंवा संस्थेची अनेक वर्षांच्या मेहनतीने कमावलेली प्रतिष्ठा क्षणात धुळीस मिळवली जाऊ शकते. अभिव्यक्ती स्वातंत्र्य हे अमर्याद नाही आणि त्याचा वापर दुसऱ्याची बदनामी करण्यासाठी होऊ शकत नाही, यावर न्यायालयाने शिक्कामोर्तब केले आहे. हा निकाल ऑनलाइन गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे आणि प्रत्येकाने समाज माध्यमांचा वापर जबाबदारीने करावा, हा संदेश यातून मिळतो.''


# चोरट्यांनी हनुमान मंदिराची दानपेटी फोडली

## ५ हजार रुपये लंपास; टेंभुर्णी शहरातील घटना

**विशाल देशमुख**

**टेंभूर्णी -** शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर परिसरात असलेल्या हनुमान मंदिराची दानपेटी फोडून चोरट्यांनी पेटीतील ५ हजार रुपये चोरुन नेले. चोरीची ही घटना मंगळवार, ३ फेब्रुवारी रोजी पहाटे पाच वाजेच्या सुमारास उघडकीस आली. आली

टेंभुर्णी शहरातील छत्रपती शिवाजी महाराज नगर परिसरात असलेल्या हनुमान मंदिरात मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास चोरटे शिरले. चोरट्यांनी मंदिराच्या दानपेटीचा कडी-कोयंडा लोखंडी टॉमीच्या सहाय्याने तोडला. चोरट्यांनी दानपेटीतील जवळपास ५ हजार रुपये चोरले. तसेच दानपेटीत १११ रुपये ठेवून पसार झाले. मंगळवारी पहाटेच्या सुमारास हनुमान भक्त सांडू राऊत हे मंदिरात दर्शनासाठी गेले असता मंदिरात चोरी झाल्याचा प्रकार त्यांच्या निदर्शनास आला. सांडू राऊत यांनी हा प्रकार इतर हनुमान भक्तांच्या निदर्शनास आणून दिला. मध्यवस्तीत असलेल्या हनुमान मंदिराची दानपेटी चोरट्यांनी लक्ष केल्याने परिसरात एकच खळबळ



उडाली आहे. दरम्यान, मंदिरात चोरी करणाऱ्या चोरट्याविरुध्द कडक कारवाई करण्यात यावी अशी मागणी सांडू राऊत व हनुमान मंदिराचे भक्तांनी टेंभुर्णी पोलिसांकडे केली आहे.

# हिवर्डीचा लाल भारतीय नौदलात दाखल

## धीरज पंडितची इंडियन नेव्हीत निवड; ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी यश

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील हिवर्डी येथील युवक धीरज लक्ष्मण पंडित (वय २०) याची इंडियन नेव्हीमध्ये निवड झाल्याने तालुक्यात आनंदाचे वातावरण आहे. ग्रामीण भागातून आलेल्या धीरजने कठोर परिश्रम, सातत्य आणि योग्य मार्गदर्शनाच्या बळावर हे यश संपादन केले असून तो हिवर्डी गावातून इंडियन नेव्हीत भरती होणारा एकमेव विद्यार्थी ठरला आहे.

धीरजचे प्राथमिक शिक्षण जिल्हा परिषद शाळा, हिवर्डी येथे इयत्ता पहिली ते सातवीपर्यंत झाले. त्यानंतर त्याने नेर येथील अभिजीत विद्यालयात आठवी ते दहावीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. पुढे सैन्यदलात जाण्याचे स्वप्न उराशी बाळगत त्याने भारत करिअर अकॅडमी, छत्रपती संभाजीनगर येथे प्रवेश घेऊन शिस्तबद्ध तयारी केली. शारीरिक तंदुरुस्ती, लेखी परीक्षा, मानसिक तयारी आणि मुलाखत या सर्व टप्प्यांत त्याने सातत्य ठेवले आणि अखेर भारतीय नौदलात निवड होण्याचे स्वप्न साकार केले. या यशाबद्दल हिवर्डी ग्रामस्थांनी, शिक्षकांनी, मित्रपरिवाराने व नातेवाईकांनी धीरज पंडितचे अभिनंदन केले आहे. ग्रामीण भागातही संधी आहेत, फक्त ध्येय ठरवून मेहनत करण्याची गरज आहे, असे मत अनेक ग्रामस्थांनी व्यक्त केले. धीरज पंडितची ही यशोगाथा ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी दिशादर्शक ठरत आहे. योग्य नियोजन, मार्गदर्शन, सातत्यपूर्ण अभ्यास आणि स्वतः वरचा विश्वास असेल तर सैन्यदलासारख्या प्रतिष्ठित सेवेतही ग्रामीण युवक उज्ज्वल कारकीर्द घडवू शकतात, हे धीरजने सिद्ध करून दाखवले आहे. आज अनेक विद्यार्थ्यांसाठी धीरज पंडित हा केवळ यशस्वी उमेदवार नसून, परिश्रमातून स्वप्नपूर्ती शक्य आहे याचे जिवंत उदाहरण ठरत आहे.

# संस्कार प्रबोधिनी च्या दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरातील संस्कार प्रबोधिनी माध्यमिक विद्यालयाच्या इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांना निरोप देण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी तर प्रमुख पाहुणे म्हणून जेष्ठ संचालक विनायकराव मामा देशपांडे, भास्करराव काळे,मुख्याध्यापक ईश्वर वाघ आदींची उपस्थिती होती. विनायकराव देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांनी शालांत परीक्षेला आत्मविश्वासाने सामोरे जावे. तसेच यशस्वी होण्यासाठी चांगल्या गोष्टी सातत्याने अंगीकारून प्रत्येक पाऊल विचारपूर्वक टाकल्यास यश हमखास मिळते, असे प्रतिपादन त्यांनी केले.पुढे बोलताना विद्यार्थ्यांनी शरीर सुदृढ ठेवल्यास मन चांगले राहते आणि यातून आपल्या हातून देशसेवेच चांगलं कार्य घडू शकते. असे ते म्हणाले. ज्येष्ठ संचालक भास्करराव काळे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले

की, विद्यार्थ्यांनी मार्गदर्शन करताना आपला स्वभाव, दैनंदिन सवयी फार महत्त्वाच्या आहे,यातून आपण यश मिळू शकतो यावेळी थोर शास्त्रज्ञ मायकेल फॅरेडे रोज मिळवता येते. यावेळी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.

विद्यार्थ्यांमधून वेदा ठोंबरे,ध्रुव निकम,तन्वी रेखा हिवाळे, शारदा उगले दहिभाते,शरयू देशमुख,राजश्री भाले,राहुल घोलप,घनश्याम माळी, शिक्षकेतर कर्मचारी नितेश काळे पवन साळवे




तणावमुक्त वातावरणात परीक्षेला सामोरे गेले पाहिजे. अध्यक्षीय समारोप करताना संस्थेचे अध्यक्ष सुरेश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना पुस्तक वाचायचे आणि प्रयोग शाळेत रात्री प्रयोग करायचे याचप्रमाणे विद्यार्थ्यांच्या दैनंदिन सवयी चांगल्या असल्या पाहिजे.यातून यश सोनवणे,नंदिनी कल्याणकर आदींनी आपले मनोगत व्यक्त केले.या कार्यक्रमास शाळेतील शिक्षक रामदास कुलकर्णी, किरण धुळे, रशीद तडवी, आदींसह विद्यार्थ्यांची मोठ्या संख्येने उपस्थित होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रेखा हिवाळे तर आभार प्रदर्शन शरयू देशमुख यांनी मानले.



# मनपाचे महापौर वंदना मगरे यांचा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडून सत्कार





**जालना । प्रतिनिधी** - महानगरपालिकेचे महापौरपदी वंदना मगरे तर उपमहापौरपदी राजेश राऊत यांची बिनविरोध निवड झाल्यानंतर भोकरदन येथे जालना महानगरपालिकेचे महापौर वंदना मगरे यांचा माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब दानवे, भाजप आमदार बबनराव लोणीकर यांच्याकडून सत्कार करण्यात आला. माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे आणि भाजप आमदार बबनराव लोणीकर यांनी पुढील वाटचालीस महापौर मगरे यांना शुभेच्छा दिल्या. यावेळी सुशीला दानवे छत्रपती फाऊंडेशनचे अध्यक्ष सुनील रत्नपारखे निरज पट्टेबादुर धनजराज काबलिये रजित मगरे सुनील चिखले आदींची उपस्थिती होती.

## सरस्वती भुवन प्रशाला रांजणी येथे तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धा उत्साहात संपन्न

**जालना । प्रतिनिधी** - माय भारत, श्री सरस्वती भुवन प्रशाला व क्रीडा भारती यांच्या संयुक्त विद्यमाने तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांचे आयोजन श्री सरस्वती भुवन प्रशाला, रांजणी येथे उत्साहात पार पडले. सदरील क्रीडा स्पर्धा प्रणित सांगवीकर, जिल्हा युवा अधिकारी (माय भारत) यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडल्या.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री. महाजन सर होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रणित सांगवीकर, जिल्हा युवा अधिकारी (माय भारत) तसेच सच्छितानंद जहागीरदार, क्रीडा शिक्षक उपस्थित होते. कार्यक्रमास शाळेतील शिक्षकवृंद, क्रीडा प्रशिक्षक तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये १०० मीटर धावणे (मुले व मुली), गोळाफेक (मुले व मुली) तसेच खो-खो (मुले व मुली) अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये तालुक्यातील विविध शाळांमधील खेळाडूंनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांमध्ये खेळाबद्दलची आवड, जिद्द व खेळाडूवृत्ती प्रकर्षाने दिसून आली.

स्पर्धा यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सुदाम तांबोळकर, ऋषिकेश जाधव, किरण थोरात यांनी क्रीडा परीक्षक म्हणून महत्त्वाची भूमिका बजावली. स्पर्धेच्या समारोपप्रसंगी विजयी खेळाडूंना ट्रॉफी, मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शारीरिक तंदुरुस्ती, संघभावना व स्पर्धात्मक वृत्ती वाढीस लागल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.



नवीन जालन्यातील रामनगर येथील बालाजी संस्थांची मिरवणूक आज रोजी निघाली असून ही मिरवणूक मोठ्या उत्साहात निघाली होती उद्या बालाजीचे लग्न असून मोठ्या थाटात आयोजन केलेले आहे. (छायाचित्र किरण खानापुरे)

## सद्भावना क्रिकेट स्पर्धेत जाफ्राबाद पोलीस संघ विजेता

### पंचायत समिती संघाला उपविजेतेपद




**विशाल देशमुख**
**टेंभूर्णी** - येथील जिल्हा परिषद प्रशालेच्या क्रीडांगणावर आयोजित सद्भावना चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात जाफ्राबाद पोलीस संघाने पंचायत समिती संघावर मात करत विजेतेपद पटकावले, तर पंचायत समिती संघाला उपविजेतेपदावर मानावे लागले. समाधान

अंतिम सामन्यात पोलीस संघाकडून महेश वैद्य यांनी अवघ्या २१ चेंडूंमध्ये ५४ धावांची झंझावाती खेळी साकारत सामन्याचे चित्र पालटले. त्यांच्या या उत्कृष्ट कामगिरीमुळे त्यांना सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच संपूर्ण स्पर्धेत सातत्यपूर्ण कामगिरी केल्याबद्दल डॉ. अमोल सोरमारे यांना मालिकावीर पुरस्कार प्रदान करण्यात आला.

विजयी संघाला आयोजकांच्या वतीने आकर्षक ट्रॉफी व पारितोषिके देऊन सन्मानित करण्यात आले.

या सद्भावना क्रिकेट स्पर्धेत जाफ्राबाद तालुक्यातील डॉक्टर्स संघटना, तहसील कार्यालय, तालुका कृषी कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, पोलीस स्टेशन आदी विभागांचे संघ सहभागी झाले होते. पोलीस संघाच्या विजयी संघात महेश वैद्य, सचिन तिडके, कमलाकर लक्कस, राम मोरे, गंगाधर खरात, अनिल सोलंके, सचिन कायंदे, सागर शिवरकर, धम्मदीप आढावे, प्रकाश पठाडे,

अनंता भुतेकर, बंडू गायकवाड, रमेश माने, प्रदीप गाडेकर, संदीप भागिले, चंद्रकांत म्हस्के, अशोक घोंगे, संदीप गवई, सुरोशे, झाल्टे, जायभाये आदी खेळाडूंचा समावेश होता.

या यशाबद्दल उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर, पोलीस निरीक्षक सतीश जाधव, सहायक पोलीस निरीक्षक महादेव चव्हाण, कैलास भारती, उपनिरीक्षक वसुदेव पवार, राजधर पठाडे, खार्डे आदी अधिकाऱ्यांनी संघाचे अभिनंदन केले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. मयूर लहाने, डॉ. अमोल सोरमारे, सुनील लोखंडे, डॉ. राहुल सोनुने, विठ्ठल नखोत, एकनाथ भोपळे, डॉ. सतीश शिंदे, गजानन जाधव, फारेस चाऊस, नाझीम मामू, डॉ. स्वप्नील उबरहंडे, शाम भालके, कमलाकर लक्कस तसेच सद्भावना संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

## कोल्हापुरात भीषण अपघात

**कोल्हापुर-** शनिवार हा अपघात वार ठरल्याचं दिसून आलं. शाहू मिल चौकात झालेल्या अपघातात दोघांचा मृत्यू झाल्यानंतर पुन्हा रेल्वे फाटक परिसरात एक अपघात झाला. केएमटी आणि दुचाकीमध्ये झालेल्या अपघातात बाप-लेकीचा जागीच मृत्यू झाल्याची घटना घडली. भाग्यश्री लक्ष्मण वंशे गवळी (वय ३०) आणि दीपक महादेव वंशे (वय ६५) अशी मृतांची नावं आहेत. भरधाव आलेल्या केएमटीने दुचाकीला मागून धडक दिल्यामुळे भाग्यश्री आणि तिचे वडील दोघांचाही जागीच मृत्यू झाला. दीपक महादेव वंशे हे नुकतेच कोल्हापूर महापालिकेतील आरोग्य विभागातून निवृत्त झाले होते.

## जे दुसऱ्याच्या दुःखात दुःख मानतात ते संत असतात - हभप प्रभाकर महाराज शास्त्री



**जालना । प्रतिनिधी** - जे दुसऱ्याच्या दुःखात सुख मानतात ते साधारण माणस असतात तर जे दुसऱ्याच्या दुःखात दुःख मानतात आणि सुखात सुख म्हणतात ते संत असतात असे प्रतिपादन गोचरण किंकर ह भ प प्रभाकर महाराज शास्त्री यांनी कीर्तनातून बोलतांना केले ते जुना जालना भागातील तुळशी पार्क येथे श्री ओंकारेश्वर महादेव मंदिराच्या कलशारोहण श्री विठ्ठल रुक्मिणी श्री गणपती, श्री गजानन महाराज यांच्या मुर्ती प्राणप्रतिष्ठा निमित्त एक दिवसीय किर्तन सोहळ्यात बोलत होते,पुढे बोलतांना महाराज म्हणाले की संत हे जगाच्या कल्याणासाठी अविरत कार्य करत असतात, साधू सतांचे जीवन हे गंगेसारखे असते जसे गंगेला हजारो गुण असतात तसेच साधू संताना ही मुख्य तीन गुण असतात, माणसाने संसाराचे चिंतन करण्यापेक्षा भगवंताचे चिंतन केले पाहिजे, जीवनात क्षणभर ही भगवंताचे नामस्मरण केले तर जीवनाचे सार्थक होते, देवाचे चिंतन नामस्मरण केल्याने आपल्या जीवनातील दुःख दूर होते, माणसाच्या जीवनातील पाप पुण्याची सामग्री म्हणजे प्रारब्ध आहे, देवाचे नामस्मरण केल्याने पाप जीवनातून निघून जाते, माणसाला पुण्य प्राप्त झाले तरच त्याच्या जीवनातील सोहळा आनंद साजरा होतो, परंतु ज्याच्याकडे कमी पुण्य आहे तो देवाला कधीच प्राप्त करू शकत नाही, ज्यांच्यावर संतांची व पूर्वजांची कृपा आहे तोच अंतकरणातून भक्तीभावाने भगवंताचे चिंतन नामस्मरण करतो, असे बोलतांना महाराजांनी सांगितले, यावेळी सर्वश्री ह भ प अशोक महाराज पाथरुडकर, विठ्ठल महाराज काळे संदीप महाराज गुंजकर, तुळशीराम महाराज दाभाडे, शुभम महाराज घेवारे, राजू महाराज गव्हाणे, भागवत महाराज नागवे, शंकर महाराज मुळे, बाळू महाराज घायाळ, पवन महाराज मुळे, जय महाराज कराड, शिवराज महाराज चव्हाण, वेदांत महाराज कुलकर्णी यांनी कीर्तनास साथ संगत केली तर प्रा. ह भ प नारायणराव बोराडे यांची उपस्थिती होती.

### जेईएस महाविद्यालयात विद्यार्थी संसदेचे उदघाटन

## सशक्त विचार हीच प्रगतीची गुरुकिल्ली - डॉ. राज रणधीर

**जालना । प्रतिनिधी** - ''आपले विचार हीच आपली खरी ऊर्जा आहे. जर आपले विचार सशक्त आणि प्रगल्भ असतील, तर आयुष्यात कशाचीही भीती बाळगण्याचे कारण उरत नाही. महाविद्यालयीन वय हे व्यक्तिमत्व घडवण्याचे वय असून, विद्यार्थ्यांनी आपले विचार प्रगल्भ करण्यावर भर द्यावा,'' असे प्रतिपादन गझलकार डॉ. राज रणधीर यांनी केले. येथील जेईएस महाविद्यालय जालना येथे युवा जल्लोष च्या कार्यक्रमांतर्गत, विद्यार्थी संसदचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षपदी संस्थेचे अध्यक्ष पुरुषोत्तमजी बगडिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. रणधीर यांनी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या प्रसिद्ध गझल रचना सादर करून त्यांनी संपूर्ण सभागृहाला मंत्रमुग्ध केले. त्यांच्या ''हवे ते कर तुला पण मी तुला विसरायच्या आधी...'' या ओळींना युवकांनी प्रतिसाद दिला. विद्यार्थी संसदेचा शपथविधी

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि महाविद्यालय गीताने झाली. प्राचार्यांनी प्रास्ताविक केल्यानंतर नवनिर्वाचित विद्यार्थी संसद सचिव कु. संस्कृती संगम आणि इतर विद्यार्थी प्रतिनिधींना शपथ देण्यात आली. यावेळी संस्कृती संगम हिने संसदेचा वार्षिक अहवाल सादर केला.

अध्यक्षीय समारोप करताना पुरुषोत्तमजी बगडिया म्हणाले की, महाविद्यालय हे केवळ शिक्षणाचे केंद्र नसून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाचे महत्त्वाचे स्थान आहे. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव देण्यासाठी महाविद्यालयाने सातत्याने नवनवीन उपक्रम राबवावेत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.




मान्यवरांची उपस्थिती

या सोहळ्याला संस्थेचे सचिव श्रीनिवास भक्कड, उपाध्यक्ष फुलचंदजी भक्कड, प्राचार्य डॉ. गणेश अग्निहोत्री, उपप्राचार्य डॉ. महावीर सदावर्ते, उपप्राचार्य प्रा. प्रवीण बाफना, पर्यवेक्षक डॉ. सुमंत बिक्कड, प्रा. ज्ञानेश्वर धनवे, युवा जल्लोष प्रमुख डॉ. हेमंत वर्मा, सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. मनोज महेर यांच्यासह शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. बाबासाहेब वाघ यांनी केले, तर प्रा. शिवानंद मुंडे यांनी उपस्थितांचे आभार मानले.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.